# तीस शेतकरी कंपन्यांना २३० कोटींचे प्रकल्प मंजूर

## 'मॅग्नेट' अंतर्गत पहिल्या टप्प्यात ७२ कोटींचे अनुदान प्रस्तावित

गणेश कोरे : ॲग्रोवन वृत्तसेवा

**पुणे : राज्यातील फलोत्पादनामध्ये मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी जागतिक बँकेतर्फे महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत पहिल्या टप्प्यात ३० शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या २३० कोटींच्या प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे. या कंपन्यांसाठी ७२ कोटींचे अनुदान प्रस्तावित करण्यात आले आहे, अशी माहिती 'मॅग्नेट'चे प्रकल्प संचालक दीपक शिंदे यांनी 'ॲग्रोवन'ला दिली.**

''राज्यातील शेती उत्पादनांचे काढणीपश्चात नुकसान टाळण्यासाठी मॅग्नेट प्रकल्पांतर्गत मूल्यसाखळी विकसित केली जात आहे. हा प्रकल्प सुरू झाल्यापासूनच्या पहिल्या टप्प्यात राज्याच्या विविध जिल्ह्यांमधून १६९ प्रस्ताव सादर झाले होते. यामध्ये १२४ शेतकरी उत्पादक कंपन्या आणि ४५ मूल्यसाखळी पान ४ वर »

### या पिकांच्या मूल्यवर्धनासाठी 'मॅग्नेट'

डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू. चिकू, भेंडी, मिरची (लाल आणि हिरवी) व फुले या ११ पिकांचा समावेश करण्यात आला आहे.

### जिल्हानिहाय पात्र संस्था

- नाशिक - ४
- नगर -३
- सोलापूर -३
- अमरावती -२
- औरंगाबाद २
- कोल्हापूर २
- नांदेड २
- सातारा २
- पुणे १
- सांगली १
- बीड १,
- बुलडाणा १
- उस्मानाबाद १
- हिंगोली १
- नंदूरबार १.

## 'मॅग्नेट'मधून २३० कोटींच्या प्रकल्पाला मान्यता

» पान १ वरून

गुंतवणूकदारांचा समावेश होता. या प्रस्तावांची छाननी करून पात्र ३० संस्थांची निवड करण्यात आली. या संस्थांच्या २३० कोटींचे प्रकल्प सादर करण्यात आले आहेत. यामधील ७२ कोटींच्या अनुदानास या संस्था पात्र झाल्या आहेत,'' असे शिंदे यांनी सांगितले.

### ...अशी होणार मूल्यसाखळी विकसित

शेतीमालाच्या काढणीपश्चात तंत्रज्ञानाअभावी मोठे नुकसान होते. हे टाळण्यासाठी पॅकहाउस, प्रतवारी केंद्र, शीतगृह, रायपनिंग चेंबर, रेफर व्हॅन, फळे, भाजीपाला निर्जलीकरण तंत्रज्ञान, निर्यात सुविधा आदी.

Agrowon Dt. 30/06/2022

# आंबा महोत्सवातून राज्यात १७ कोटींची उलाढाल

**थेट विक्रीचा शेतकऱ्यांसह ग्राहकांनाही फायदा**




महोत्सवातील दर्जेदार आंबा.



चोखंदळ ग्राहक आंबा खरेदी करताना

**गणेश कोरे**

**महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाद्वारे २१ वर्षांपासून पुण्यासह महत्त्वाच्या अन्य जिल्ह्यांमध्ये आंबा महोत्सवाचे आयोजन यशस्वीपणे करण्यात येत आहे. यंदाच्या (२०२२) आंबा महोत्सवाची नुकतीच सांगता झाली. पुण्यात १३ कोटी, तर राज्यात सुमारे १७ कोटी रुपयांच्या आंब्याची थेट विक्री उलाढाल झाली. कोरोनामुळे मागील दोन वर्षांत प्रत्यक्ष आयोजन न झाल्याने यंदाची उलाढाल आंबा बागायतदारांसाठी उत्साहवर्धक व उमेद वाढवणारी ठरली.**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत दरवर्षीप्रमाणे 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजनेअंतर्गत आंबा महोत्सवाचे आयोजन सन २००२ पासून राज्यात विविध ठिकाणी करण्यात येते. विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व त्याचवेळी ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा माल मिळावा हा महोत्सवाचा उद्देश असतो. पुणे येथील मार्केट यार्ड परिसरातील वखार महामंडळाच्या जागेत यंदा एक एप्रिल ते तीन जून या कालावधीत महोत्सव झाला. सुमारे ५१ स्टॉल आंबा उत्पादकांना उपलब्ध करून देण्यात आले. महोत्सवात सहभागी शेतकरी एकत्रितपणे (आपापल्या भागानुसार) आंबा विक्रीस आणतात. यात प्रति गटाचा अंदाजे पाच लाखांचा आंबा थेट विकला जातो. हाच आंबा बाजार समितीत विकल्यास अडत, कमिशन द्यावे लागते. मोठ्या प्रमाणात आवक झाल्यास दर पडतात. यामुळे आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते.

## महोत्सवाचे चित्र

रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील सुमारे ७० हापूस आंबा उत्पादक यंदाच्या महोत्सवामध्ये सहभागी झाले. यंदा हंगामाच्या सुरुवातीस म्हणजे मार्च-एप्रिलमध्ये आवक कमी होती. त्यामुळे दरही जास्त होते. वजन आणि दर्जानुसार ७०० चे १२०० रुपये प्रति डझन दर होते. अवकाळी पाऊस, दिवसा कडकडीत ऊन व रात्रीचा गारवा असे हवामानातील बदल ही आवक कमी असण्याची कारणे होती. एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात आवक वाढून दरही कमी होऊ लागले. एप्रिलच्या शेवटचा आठवडा ते मेच्या पहिल्या आठवड्यापासून आवकेत मोठी वाढ होऊन दर प्रति डझन ५०० ते ७०० रुपयांदरम्यान तर मे व हंगामाच्या अखेरच्या टप्प्यात ते ३०० ते ५०० रुपयांच्या दरम्यान राहिले. महोत्सवात सुमारे दोन लाख डझनांपेक्षा जास्त आंबा विकला गेला. त्यातून सुमारे १३ कोटी रुपयांची उलाढाल झाली.

## दृष्टीक्षेपात आंबा महोत्सव

| विभाग | महोत्सवांची संख्या | स्टॉलधारक शेतकरी | उलाढाल |
|---|---|---|---|
| पुणे मुख्यालय | १ | ७० | १४ कोटी ६० लाख |
| पुणे विभाग | ३ | ५५ | ४८ लाख १० हजार |
| औरंगाबाद | १ | २१ | ४० लाख ५ हजार |
| कोल्हापूर | ३ | ५९ | ८९ लाख ७५ हजार |
| नाशिक | २ | १३१ | ५८ लाख १५ हजार |
| रत्नागिरी | ३ | २८ | १३ लाख ५० हजार |
| एकूण | १३ | ३६४ | १७ कोटी ९ लाख |

## राज्यभर विस्तार

पूर्वी आंबा महोत्सव केवळ पुणे शहरात व्हायचा. मात्र दरवर्षी विविध शहरांमध्ये तो आयोजित करण्याच्या सूचना पणनमंत्री बाळासाहेब पाटील आणि राज्यमंत्री शंभुराज देसाई यांनी केल्या. त्यामुळे कुर्डुवाडी, पिंपरी-चिंचवड, मुंबई, औरंगाबाद, पाल (जळगाव), बाभळेश्वर (नगर), सांगली, रत्नागिरी, दापोली, कोल्हापूर तसेच कर्नाटक राज्याच्या फलोत्पादन विभागाच्या सहकार्याने बेळगाव येथे पाच दिवसीय महोत्सवाचे अभियान यशस्वी करण्यात आले. देवगड आणि रत्नागिरी आंब्याच्या दरांत फरक नसतो. हंगामानुसार ते ठरतात. हंगामाच्या प्रारंभी प्रति डझन एक हजार, बाराशेपासून हंगामाच्या अखेरीस ते ३०० रुपयांपर्यंत खाली येतात. पूर्णहंगामात सरासरी दर ५०० ते ७०० रुपये मिळतो. हापूस व्यतिरिक्त अन्य कोणते आंबे महोत्सवात असतात? महोत्सवात मुख्यत्वे कोकणातील हापूस उत्पादकच सहभागी झालेला असतो. त्यामुळेच हाच आंबा प्रामुख्याने असतो. त्याचा हंगाम संपल्यावर केसर आणि स्थानिक रायवळची आवक होते. या दरम्यान महोत्सवाची सांगता झालेली असते. शेतातून महोत्सवापर्यंत आंबा वाहतुकीचा खर्च शेतकऱ्यांनाच करावा लागतो. ग्राहकांसोबत अनेक वर्षांचे संबंध तयार झाल्याने ग्राहक शेतकऱ्यांना महोत्सवाबाबत विचारणा करीत असतात. त्यामुळे ग्राहकांची पसंतीही बागायतदारांना चांगली माहीत असते.

## बागायतदारांसाठी सुविधा

महोत्सवात पणन मंडळातर्फे स्टॉलची व्यवस्था केली जाते. यासाठी सामुहिक मंडप उभारला जातो. वीज, पाणी, राहण्याच्या सोयीसह अग्नीरोधक यंत्रणा प्रत्येक स्टॉलला दिली जाते. आपत्कालीन परिस्थितीत आग लागल्यास ती विझविण्याचे प्रशिक्षण दिले जाते. या अनुषंगाने बागायतदार गणेश देसाई यांनी अपेक्षा व्यक्त केली. महोत्सवामध्ये स्टॉलची संख्या मर्यादित म्हणजे २५ ते ३० पर्यंत असावी. शेतकऱ्यांची राहाण्याची अधिक चांगली हवी असे ते म्हणतात.

> **वीस वर्षांपासून सुरू असलेला व शेतकरी आणि ग्राहकांचे ऋणानुबंध निर्माण करणारा 'पणन मंडळाचा आंबा महोत्सव हा लोकप्रिय ब्रँड' निर्माण झाला आहे.**
>
> **सुनील पवार**, कार्यकारी संचालक राज्य कृषी पणन मंडळ पुणे

> **पंधरा वर्षांपासून पुण्यासह सांगली व कोल्हापूर येथील आंबा महोत्सवात सहभागी होतो. बाजार समितीमधील हमाली, तोलाई, अडत या कोणत्याही बाबी द्याव्या लागत नाहीत. पुण्यातील महोत्सवात ५०० पेट्यांची विक्री केली.**
>
> **गणेश प्रभाकर देसाई**, मांजरे, ता.संगमेश्वर,जि. रत्नागिरी ९५५२८५३४२१

> **महोत्सवात आगाऊ 'ऑर्डर्स' नोंदविल्या जातात. त्यामुळे जलद विक्री होण्यास मदत होते.**
>
> **सत्यवान लक्ष्मण थोटम**, पूरळ हुर्शी, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग ९८२३४९७१२१



पुणे आंबा महोत्सवासाठी करण्यात आलेली स्टॉलची व्यवस्था

## कोरोना संकटात ऑनलाइन महोत्सव

कोरोना संकटात २०२० आणि २०२१ मध्ये आंबा विक्रीचे मोठे आव्हान शेतकऱ्यांसमोर होते. बाजार समित्या, बाजारपेठा, दळणवळण बंद होते. अशावेळी पणन मंडळाद्वारे ऑनलाइन आंबा महोत्सवाचे आयोजन झाले. पुणे- गुलटेकडी मार्केटयार्ड येथील वखार महामंडळाचे गोदाम भाडेतत्वावर घेण्यात आले. किरकोळ विक्रीसाठी वाहने उपलब्ध केली. पणन मंडळाच्या संकेस्थळावरील पोर्टल कार्यरत झाले. त्याद्वारे सुमारे ४०० आंबा उत्पादकांकडून नोंदणी झाली. राज्यभरातील निवासी सोसायट्या, कार्यालये, सामाजिक संस्था, वैयक्तिक ग्राहक, निर्यातदार आदींना आंबा उपलब्ध करून देण्यात आला. त्यातून २०२० मध्ये ६५ हजार डझन, तर २०२१ मध्ये १ लाख ४२ हजार आंब्याची थेट विक्री झाली. त्यातून अनुक्रमे ३ कोटी ९० रुपये व सात कोटी ७० लाखांची उलाढाल झाल्याचे पणन मंडळाचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे यांनी सांगितले.

Agrowon Dt. 23/06/2000

# आंबा महोत्सवात १७ कोटींचे उत्पन्न

## २.८० लाख डझन आंब्यांची विक्री

म. टा. प्रतिनिधी, पुणे



संग्रहित छायाचित्र

कृषी पणन मंडळाच्या वतीने पुण्यासह राज्याच्या विविध भागांत आंबा महोत्सव राबविण्यात आला होता. त्या महोत्सवांतर्गत २.८० लाख डझन आंब्यांची विक्री करण्यात आली असून, त्याद्वारे १७ कोटींहून अधिक रुपयांचे उत्पन्न आंबा उत्पादकांना मिळाले आहे.

राज्य कृषी पणन मंडळामार्फत दर वर्षीप्रमाणे उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेंतर्गत आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव आणि ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा माल मिळावा, या उद्देशाने महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. वखार महामंडळाच्या मोकळ्या जागेत एक एप्रिल ते तीन जून या कालावधीत महोत्सव झाला.

या वर्षी सुमारे ५१९ स्टॉल आंबा उत्पादकांना उपलब्ध करून देण्यात आले. कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील सुमारे ७० हापूस आंबा उत्पादक यामध्ये सहभागी झाले होते. हंगामाच्या सुरुवातीस म्हणजे मार्च व एप्रिलमध्ये आंब्याची आवक कमी प्रमाणात होती. त्यामुळे प्रति डझन दर जास्त होते. एप्रिलच्या शेवटचा आठवडा ते मेच्या पहिल्या आठवड्यापासून आवक जवळपास दुप्पट वाढली. यामुळे दरही कमी झाले. या वेळेला ५०० ते ७०० रुपयांचे दर १० मेनंतर ३०० ते ५०० रुपये प्रति डझनपर्यंत खाली आले. पुण्यासह राज्यात पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, नाशिक, रत्नागिरी या विभागांत आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. पुण्यासह राज्यातील विविध ठिकाणच्या महोत्सवांमध्ये २.८० लाख डझन आंब्यांची विक्री झाली. त्यातून १७ कोटी नऊ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले, अशी माहिती पणन मंडळाचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे यांनी दिली.

पणन मंडळाच्या वेबसाइटवरील bs.msamb.com या पोर्टलवर ४०० आंबा उत्पादकांनी नोंदणी केली होती.

Maharashtra Times Dt. 17/06/2022

# पणन मंडळाच्या शेतमाल तारण कर्जाचा उच्चांक

## गेल्या तीन वर्षांत दुपटीने वाढ; यंदा शेतकऱ्यांना ५५ कोटींचे वितरण

**गणेश कोरे** : ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : ''पणन मंडळाद्वारे बाजार समित्यांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या शेतमाल तारण कर्ज योजनेला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. गेल्या तीन वर्षांत कर्जवितरणात दुपटीने वाढ झाली आहे. यावर्षी (२०२१-२२) सुमारे २ लाखांपेक्षा अधिक क्विंटल शेतमालाच्या तारणातून ५५ कोटी ३९ लाख रुपयांचे कर्जवाटप झाले आहे,'' अशी माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

पवार म्हणाले,''शेतमाल काढणी




हंगामात बाजार समित्यांमध्ये अचानक आवक होऊन, मागणी आणि पुरवठ्याचे सूत्र विस्कळित होते. त्यामुळे शेतमालाचे दर पडतात. या काळात शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी ही योजना आहे. पणन मंडळाद्वारे १९९१ पासून शेतमाल तारण योजना बाजार समित्यांद्वारे राबविण्यात येत आहे. गोदामांची सुविधा असलेल्या बाजार समित्यांमध्ये एकूण शेतमालाच्या रकमेच्या ७५ टक्के कर्ज शेतकऱ्यांना ६ टक्के व्याजदराने दिले जाते. या योजनेमध्ये सहभागी होण्याचे शेतकऱ्यांचे प्रमाण दरवर्षी वाढत आहे. गेल्या तीन वर्षांच्या तुलनेत यावर्षी सुमारे ४ हजार शेतकऱ्यांनी दोन लाख क्विंटल शेतमालाच्या तारणातून ५५ कोटींचे कर्ज घेतले. यामध्ये प्रामुख्याने सोयाबीन, भात, चणा आणि तुरीबरोबरच काजू उत्पादक शेतकऱ्यांचा सहभाग जास्त आहे.''

''पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या सूचनेनुसार काजूचा समावेश तारण कर्जात केला आहे. या वर्षी १ कोटी ४१ लाखांचे कर्जवाटप झाले. पुढील वर्षी २ कोटींपर्यंत कर्जवाटप होईल,'' असे पवार म्हणाले.

**गेल्या तीन वर्षांतील आकडेवारी**

| वर्ष | बाजार समित्यांची संख्या | शेतकरी संख्या | तारण मालाचे वजन (क्विंटल) | कर्जाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| २०१९-२० | ९० | ३ हजार ३८० | १ लाख ४८ हजार | ३२ कोटी ५९ लाख |
| २०२०-२१ | ५८ | १ हजार ८७२ | ९० हजार क्विंटल | २३ कोटी ५९ लाख |
| २०२१-२२ | ८० | ४ हजार ६८६ | २ लाख २७ हजार | ५५ कोटी ३९ लाख |

Agrowon Dt. 14/06/2022



# सेस नसलेल्या मालांवर लवकरच 'युजर चार्जेस'?

## कृषी बाजार समितीचा पणन संचालकांकडे प्रस्ताव

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : मार्केट यार्डातील भुसार विभागात यापुढे सेस नसलेल्या मालांवर 'युजर चार्जेस' आकारले जाणार आहे. तसा प्रस्तावच पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीने राज्याच्या पणन संचालकांकडे सादर केला आहे. त्याला मान्यता मिळाल्यास बाजार समितीला वर्षाकाठी सुमारे १५ कोटी रुपयांचे उत्पन्न वाढणार आहे.

सद्य:स्थितीत मार्केट यार्डातील भुसार विभागात सुमारे ५००० हजारांपेक्षा जास्त वस्तू येतात. यातील ६०-६५ वस्तूंवरच 'बाजार फी' (सेस) आकाराले जात आहे. त्यामुळे बाजार समितीच्या उत्पादनात वाढ होत नाही.

दरम्यान, राज्य सरकारने कायद्यात बदल करून कृषी व्यतिरिक्त मालावर 'युजर चार्जेस' (वापर आकार) घेण्यासाठी परवानगी दिली आहे. त्यामुळे आता सेस नसलेल्या मालांवर 'युजर चार्जेस' लावून उत्पन्न वाढविण्यास मदत होऊ शकते.

### समान न्याय द्या...

बाजारात येणाऱ्या वस्तूंमध्ये डाळी, सुकामेवा, तेल यासह विविध वस्तू येतात. यावर बाजार फी घेतली जात नाही. तर यामध्ये तांदूळ, मसाल्याचे पदार्थ यासह विविध वस्तूंवर सेस घेतला जातो. मग डाळी, सुकामेवा, तेल यासह विविध वस्तू शेतमाल नाही का? एकतर सर्व प्रकारच्या शेतमालावर बाजार फी घ्या किंवा सगळ्यांवरची काढून टाका. त्यामुळे सगळ्या व्यापाऱ्यांना समान न्याय मिळेल, अशी मागणी एका ज्येष्ठ व्यापाऱ्याने केली.

### सेस होणार दुप्पट

भुसार बाजारातून सध्या वर्षाकाठी सुमारे १८-२० कोटींचा सेस जमा होतो. 'युजर चार्जेस' लागू झाल्यानंतर त्यात वाढ होऊन वर्षाकाठी सुमारे ३५ कोटींचा सेस जमा होईल, असा अंदाज बाजार समितीतील अधिकाऱ्यांनी वर्तविला आहे.

बाजार समितीने कृषी व्यतिरिक्त मालावर एक टक्का 'युजर चार्जेस' (वापर आकार) आकारण्याचा प्रस्ताव दिला आहे. यामुळे बाजार समितीच्या उत्पादनात मोठी वाढ होईल.

- मधुकांत गरड, प्रशासक, कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

बाजार फी'च्या माध्यमातून उत्पन्न वाढविण्यापेक्षा सध्या ज्या वस्तूंवर सेस नाही अशांकडून ज्याप्रमाणे बाजार समिती वार्षिक देखभाल आकारते, त्या पद्धतीने ज्या वस्तूंवर सेस आहे, तो कमी करून भूखंडाच्या क्षेत्रफळावर आधारित वार्षिक देखभाल आकारणी करावी. अन्यथा पारंपरिक व्यवसाय कमी होईल.

- राजेंद्र बाठिया, अध्यक्ष, दि पूना मर्चंट्स चेंबर

Lokmat Dt.13/06/2022

# सोयाबीन ३५०, कापसात ३५५ रुपये वाढ

## केंद्र सरकारकडून खरीप २०२२-२३चे हमीभाव जाहीर

Agrowon Dt. 09/06/2022

**पुणे : केंद्र सरकारने तिळाच्या हमीभावात सर्वाधिक वाढ केली आहे. सोयाबीनला ३५० रुपयांची वाढ मिळाली. तर कापसाला लांब धाग्यासाठी ३५५ रुपये आणि मध्यम धाग्यासाठी ३५४ रुपये वाढविण्यात आले. केंद्राने यंदा सोयाबीनसह इतरही तेलबिया पिकांच्या हमीभावात गेल्या वर्षीच्या तुलनेत अधिक वाढ केल्याचे दिसते.** पान २ वर »

### कोणत्या पिकांच्या हमीभावात किती वाढ?

| पीक | २०२१-२२ | २०२२-२३ | वाढ |
|---|---|---|---|
| सोयाबीन | ३९५० | ४३०० | ३५० |
| कापूस (मध्यम धागा) | ५७२६ | ६०८० | ३५४ |
| कापूस (लांब धागा) | ६०२५ | ६३८० | ३५५ |
| तूर | ६३०० | ६६०० | ३०० |
| मूग | ७२७५ | ७७५५ | ४८० |
| उडीद | ६३०० | ६६०० | ३०० |
| मका | १८७० | १९६२ | ९२ |
| भात (सामान्य) | १९४० | २०४० | १०० |
| भात (ए ग्रेड) | १९६० | २०६० | १०० |
| ज्वारी (हायब्रीड) | २७३८ | २९७० | २३२ |
| ज्वारी (मालदांडी) | २७५८ | २९९० | २३२ |
| बाजरी | २२५० | २३५० | १०० |
| रागी | ३३७७ | ३५७८ | २०१ |
| भुईमूग | ५५५० | ५८५० | ३०० |
| सूर्यफूल | ६०१५ | ६४०० | ३८५ |
| तीळ | ७३०७ | ७८३० | ५२३ |
| कारळे | ६९३० | ७२८७ | ३५७ |

सकाळ

**निर्यात खर्चात बचत :** ऐतिहासिक क्षण असल्याचे सुनील पवार यांचे मत

# भारतीय आंबा समुद्रमार्गे अमेरिकेत

**पुणे, ता. ६ :** ''निर्यात खर्च कमी करून भारतीय आंबा अमेरिकेत रास्त दरात उपलब्ध होण्यासाठी गेल्या तीन वर्षांपासून सुरु असलेल्या प्रयत्नांना अखेर यश आले आहे. कारण देशातून पहिल्यांदाच समुद्रमार्गे आंबा निर्यात सुरू झाली आहे. हा क्षण ऐतिहासिक आहे,'' अशी माहिती राज्याचे पणन संचालक तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.




**वाशी, नवी मुंबई : विकिरण सुविधा केंद्रातून अमेरिकेला भारतातून प्रथमच आंब्याची समुद्रमार्गे निर्यात करण्यात आली.**

**आंब्याच्या समुद्रमार्गे निर्यातीमुळे वाहतूक खर्च दहा टक्क्यांवर येणार असल्याने भारतीय आंबा अमेरिकेतील बाजारपेठेत इतर देशांतील आंब्यांशी स्पर्धा करू शकेल. तसेच दीड महिन्याच्या जादा कालावधीसाठी तो तेथे उपलब्ध राहील.**
**- सुनील पवार,** कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ.

भाभा अ‍ॅटोमिक रिसर्च सेंटर, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, अपेडा आणि सानप अ‍ॅग्रो अ‍ॅनिमल्स यांच्या प्रयत्नांतून समुद्रमार्गे भारतीय आंबा नुकताच अमेरिकेत निर्यात करण्यात आला. अमेरिकेचे क्वारंटाइन विभागाचे अधिकारी डॉ. कॅथरिन फिडलर, भाभा अ‍ॅटोमिक रिसर्च सेंटरच्या बायोसायन्स विभागाचे संचालक डॉ. टी. के. घंटी, 'एनपीपीओ'चे उपसंचालक डॉ. झेड. ए. अन्सारी, 'सानप अ‍ॅग्रो'चे संचालक शिवाजीराव सानप, 'वाफा'चे अध्यक्ष अण्णा शेजवळ यांच्या उपस्थितीत हिरवा झेंडा दाखवून हा कंटेनर अमेरिकेसाठी रवाना झाला. पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील म्हणाले, '' पाच हजार ५२० बॉक्समधून १६ हजार ५६० किलो आंबा कंटेनरद्वारे अमेरिकेला पाठविण्यात आला आहे. २५ दिवसांच्या सागरी प्रवासानंतर तो न्यूजर्सी शहराजवळील नेवार्क या बंदरात पोहोचणार आहे.''

## तीन वर्षे प्रयोग...

भाभा अ‍ॅटोमिक रिसर्च सेंटर, अपेडा, पणन मंडळ यांच्यावतीने २०१९ मध्ये आंबा समुद्रमार्गे निर्यातीचा प्रयोग केला होता. यात आंब्यावर विविध प्रक्रिया करून तो कंटेनरमध्ये भरून कृषी पणन मंडळाच्या विकिरण सुविधेद्वारे साठवणूक करून ठेवला होता. हा कंटेनर ३८ दिवसांनी उघडण्यात आला. त्या वेळी हा आंबा सुस्थितीत होता. मात्र, काही त्रुटी आढळून आल्याने त्या दुरुस्त करण्यात आल्या. त्यानंतर यंदा यशस्वीपणे आंबा निर्यात करण्यात आली आहे.

## हवाईमार्गे निर्यातीत मर्यादा

- २०१९ मध्ये अमेरिकेस एक हजार २०० टन आंबा निर्यात
- २०२० व २०२१ मध्ये कोरोनामुळे निर्यात होऊ शकली नाही.
- अमेरिकेला यापूर्वी होणारी आंबा निर्यात हवाईमार्गे होत
- निर्यातदारांना प्रतिकिलो ५५० रुपये विमानभाडे द्यावे लागत
- अमेरिकेत भारतीय आंबा महाग असल्याने निर्यातीवर मर्यादा

Pune, Main
07/06/2022 Page No. 3

# निर्यातीचा गोडवा वाढविणारा 'मार्ग'

**आंब्याबरोबर इतरही नाशिवंत शेतीमालावर टिकवणक्षमता वाढवून निर्यातवृद्धीचे प्रयोग देशात सातत्याने व्हायला हवेत.**

भारतातून पहिल्यांदाच समुद्रमार्गे आंबा निर्यात आता सुरू झाली आहे. भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर (बीएआरसी), पणन मंडळ, अपेडा आणि एका खासगी कंपनीच्या संयुक्त प्रयत्नातून चार दिवसांपूर्वीच समुद्रमार्गे आंबा अमेरिकेला पाठविण्यात आला आहे. आंबा निर्यातीमधील ही ऐतिहासिक कामगिरी असून हा बदल क्रांतिकारक ठरणारा आहे. आत्तापर्यंत नाशिवंत अशा आंब्याची निर्यात अमेरिकेला विमानानेच होत होती. अशा निर्यातीला प्रतिकिलो ५५० रुपये खर्च येतोय. हवाईमार्गे निर्यातीसाठीच्या एवढ्या खर्चाने उत्पादक तसेच निर्यातदार सुद्धा आंब्याची निर्यात करण्यासाठी धजावत नाहीत. विदेशी ग्राहकांनाही निर्यातीचा आंबा खूप महागात पडतोय. आता समुद्रमार्गे आंबा निर्यातीत हवाईमार्गाच्या तुलनेत खर्च १० टक्केवर येणार आहे. प्रतिकिलो जेमतेम ५० रुपयांमध्ये आपण आंबा अमेरिकेला पाठवू शकू. संशोधन, विक्री, निर्यात यातील संस्था आणि निर्यातदार यांनी एकत्र काम केले, निर्यातीतील अडचणी समजून घेऊन त्यावर संशोधनातून मार्ग काढले तर शेतीमाल निर्यातीचे अनेक मार्ग प्रशस्त होऊ शकतात, याचे उत्तम उदाहरण म्हणजे समुद्रमार्गे आंब्याची नुकतीच करण्यात आलेली निर्यात हे होय. जलमार्गाने निर्यातीत वाहतूक खर्च कमी झाल्याने आपण इतर देशांशी आता स्पर्धा करू शकणार आहोत. बाहेर देशांत असलेल्या भारतीयांबरोबर काही परदेशी ग्राहक सुद्धा आपले आंबे पसंत करतात. अमेरिकेत आपले आंबे फारसे जात नसल्याने अमेरिकेतील ग्राहक पूर्वी कॅनडात जाऊन भारतीय आंब्यांचा आस्वाद घेत असत. शिवाय अमेरिकेमध्ये मेक्सिको आणि पाकिस्तानमधून मोठ्या प्रमाणात आंबा येतो. आता थेट अमेरिकेत जलमार्गे आंबा निर्यात वाढवून हे सगळे मार्केट आपल्याला मिळविता येऊ शकते.

निर्यातीसाठीच्या विविध प्रकारच्या उपचाराने वाहतुकीत २० ते २५ दिवस आणि विक्रीसाठीचे १५ ते २० दिवस असा दीड महिना जागतिक बाजारात आपल्या आंब्याची उपस्थिती वाढू शकते. आंबा निर्यातवृद्धीसाठी हे मोठे योगदान राहणार आहे. आपल्याकडे हापूस संपत आला की केसरचा हंगाम सुरू होतो. हे दोन्ही निर्यातक्षम आंबे आहेत. हापूसच्या तुलनेत केसरची टिकवणक्षमता अजून जास्त आहे. त्यामुळे आधी हापूस आणि त्यानंतर केसर अशी टप्प्याटप्प्याने आपल्याला समुद्रमार्गे निर्यात वाढविता येऊ शकते. भारतासह जगभरच पाऊस पडल्यावर आंबे न खाण्याची प्रथा आहे. त्याला शास्त्रीय आधार देखील आहे. वातावरणात आर्द्रता वाढली की फळमाशीच्या अळ्या बाहेर पडून आंबे खराब होतात. परंतु जलमार्गे करण्यात येणाऱ्या निर्यातीसाठी विविध उपचारांने आंबा खराब होत नाही. महाराष्ट्र राज्य पणन मंडळाने वाशीला जे निर्यात सुविधा केंद्र उभारले ते भारतातील सर्वोत्तम आहे. या सुविधा केंद्राचा हापूस तसेच केसर निर्यातीसाठी उत्पादकांना फायदा होत आहे. जलमार्गे आंबा निर्यातीच्या सर्व ट्रायल्स नियंत्रित वातावरणात 'बीएआरसी'च्या मदतीने घेतल्या आहेत. हा प्रयोग यशस्वी झाल्यास अमेरिकेसह इतरही देशांत जलमार्गे आपली आंबा निर्यात वाढेल. त्यामुळे अपेडा, राज्य पणन मंडळ तसेच केंद्राचे वाणिज्य-व्यापार मंत्रालयाने जलमार्गे कुठे कुठे आपण आंबा पाठवू शकतो, हे पाहून तेथे निर्यातीचे प्रयत्न वाढवायला पाहिजेत. जागतिक व्यापार संघटना निर्यातीला आपण देत असलेल्या थेट अनुदानावर वारंवार आक्षेप घेत आले आहे. निर्यातीमध्ये वाहतूक अनुदान, निर्यात अनुदान दिले की इतर स्पर्धक देशही तक्रारी करतात. जागतिक व्यापार संघटना देखील संबंधित देशाला असे अनुदान बंद करायला लावते. त्यामुळे असे वेगवेगळे प्रयोग करूनच निर्यातीमधील खर्च कमी करणे आणि टिकवणक्षमता वाढविणे हाच चांगला पर्याय आपल्याकडे उरतोय. आंब्याबरोबर इतरही नाशिवंत शेतीमालावर असे टिकवणक्षमता वाढवून निर्यातवृद्धीचे प्रयोग सातत्याने व्हायला हवेत.

Agrowon Dt.07/06/2022

पुण्य नगरी

# भारतीय आंबा प्रथमच समुद्रमार्गे अमेरिकेत

## सुमारे दीड महिना जादा कालावधीसाठी तेथील बाजारपेठेत राहणार

## पणन संचालक सुनील पवार यांनी दिली माहिती

**पुणे :** भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, अपेडा आणि सानप ॲग्रो ॲनिमल्स प्रा. लि. यांच्या संयुक्त प्रयत्नांनी भारतीय आंबा प्रथमच समुद्रमार्गे अमेरिकेत रवाना झाला आहे. भारतीय आंब्याच्या निर्यातीतील हा ऐतिहासिक क्षण आहे, असे प्रतिपादन राज्याचे पणन संचालक तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी केले. वाशीतील सुविधा केंद्रातून अमेरिकेला देशातून प्रथमच आंब्याची समुद्रमार्गे निर्यात केली. यावेळी कार्यक्रमाला भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरच्या बायोसायन्स विभागाचे संचालक डॉ. टी. के. घंटी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

आंब्याच्या समुद्रमार्गे निर्यातीमुळे आंब्याचा वाहतूक खर्च १० टक्क्यांवर येणार असून त्यामुळे अमेरिकेतील बाजारपेठेत भारतीय आंबा स्पर्धात्मकरीत्या उतरून इतर देशांतील आंब्याशी स्पर्धा करू शकेल. तसेच समुद्रमार्गे निर्यातीमुळे आंबा सुमारे दीड महिन्याच्या जादा कालावधीसाठी तेथील बाजारपेठेत राहील. भारतीय आंब्याच्या इतिहासातील ही अत्यंत महत्त्वाची घटना असून आंब्याच्या निर्यातीमधील क्रांतीबदल यामुळे होईल, असेही सुनील पवार म्हणाले. डॉ. टी. के. घंटी यांनी कृषिमालाची निर्यात आणि कृषीमालाची साठवणूक क्षमता वाढवण्यासाठी भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर कृषी पणन मंडळास सर्वतोपरी मदत करेल. संशोधनात आम्ही मोठे काम करत आहोत. आमचे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी कृषी पणन मंडळाने काम करावे, असे आवाहन डॉ. घंटी यांनी केले.

### आंबा साठवणुकीसाठी संशोधन

सन २०१९ मध्ये भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, अपेडा, कृषी पणन मंडळ यांनी संयुक्तरीत्या आंबा समुद्रमार्गे निर्यातीचा प्रयोग केला होता. या प्रयोगात आंब्यावर व गरम पाण्याची प्रक्रिया, भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरने विकसित केलेल्या आंब्याच्या शेल्फ-लाईफसाठीची थंड पाण्यातील रासायनिक प्रक्रिया, विकिरण प्रक्रिया, प्रशितकरण आणि शीतगृहात साठवणूक करून आंब्याचा कंटेनर भरून कंटेनर कृषी पणन मंडळाच्या विकिरण सुविधेच्या आवारात विद्युत पुरवठा देऊन ठेवण्यात आला होता. हा कंटेनर ३८ दिवसांनी उघडण्यात आला. या कंटेनरमधील आंबा सुस्थितीत होता. तथापि, यामध्ये काही त्रुटी आढळून आल्याने त्या दुरुस्त करून पुन्हा कंटेनर ट्रायल घेणे आवश्यक होते. तथापि, सन २०२० आणि २०२१ मध्ये कोरोनामुळे कामकाज होऊ शकले नाही.

### अशी झाली प्रक्रिया

आंबा हंगाम २०२२ मध्ये कंटेनर थेट अमेरिकेत पाठवण्याचे नियोजन केले. ३० मेपासून आंब्यावर सर्व प्रकारच्या प्रक्रिया कर
कोल्डस्टोअरेजमध्ये साठवला होता. एकूण ५
हजार ५२० बॉक्समधून १६ हजार ५६० किलो
आंबा कंटेनरद्वारे पाठवला आहे. कंटेनरसाठ
२९ मे ते २ जून २०२२ असे पाच दिवस आंबा नोंदणीकृत बागांमधून तोडणी करून कृषी पणन मंडळाच्या भाजीपाला प्रक्रिया केंद्र, वाशी
नवी मुंबईत आणण्यात आला. भाजीपाला प्रक्रिया केंद्रात आंब्याची प्रतवारी करून त्यावर सोडिअम हायपोक्रोराईटची ५२ डि. से. तापमानात तीन मिनिटांची प्रक्रिया करून आंबा सुकवण्यात आला. त्यानंतर आंब्यावर भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरने विकसित केलेल्या रसायनाची पाण्यामध्ये तीन मिनिटांच
प्रक्रिया करून पुन्हा आंबा सुकवण्यात आला. आंबा तीन किलोच्या बॉक्समध्ये भरून त्याची विकिरण सुविधा केंद्रात वाहतूक करून त्याचे अमेरिकन इन्स्पेक्टर आणि एन.पी.पी.ओ.च्या अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर त्यांच्या मान्यतेनंतर आंब्यावर विकिरण प्रक्रि
करण्यात आली. त्यानंतर आंबा प्रशितकरण करून त्याची साठवणूक शीतगृहात केली हो

# भारतीय आंबा प्रथमच समुद्रमार्गे अमेरिकेला

## पंचवीस दिवसांच्या समुद्र प्रवासाने पोहोचणार न्यू जर्सी येथे

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : अमेरिकेमध्ये भारतीय आंबा निर्यात खर्च कमी होऊन, रास्त दरात उपलब्ध व्हावा यासाठीच्या गेल्या तीन वर्षांच्या प्रयत्न आणि प्रयोगाला अखेर यश आले आहे. भारतातून पहिल्यांदाच समुद्रमार्गे आंबा निर्यात सुरू झाली आहे. ही ऐतिहासिक कामगिरी असल्याचे प्रतिपादन पणन संचालक आणि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी केले.

५ हजार ५२० बॉक्सेसमधून १६ हजार ५६० किलो आंबा कंटेनरद्वारे पाठविण्यात आला आहे. सर्व प्रक्रिया होऊन ५ जून रोजी आंबा प्रत्यक्षात जहाजावर लोड होऊन, अमेरिकेकडे रवाना होईल. सुमारे २५ दिवसांच्या सागरी प्रवासानंतर कंटेनर अमेरिकेतील नेवार्क या न्यू जर्सी शहराजवळील बंदरात ३० जून रोजी पोहोचणार आहे. भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, अपेडा आणि सानप ॲग्रो ॲनिमल्स यांच्या संयुक्त प्रयत्नांनी भारतीय आंबा प्रथमच समुद्रमार्गे अमेरिकेत निर्यात झाला आहे. या वेळी अमेरिकेचे क्वारंटाइन विभागाचे इन्स्पेक्टर डॉ. कॅथरिन फिडलर, भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरच्या बायोसायन्स विभागाचे संचालक डॉ. टी. के. घंटी, एन.पी.पी.ओ.चे उपसंचालक डॉ. झेड. ए. अन्सारी, 'अपेडा'चे उपसरव्यवस्थापक श्री. रवींद्र, सानप ॲग्रो ॲनिमल्सचे संचालक श्री. शिवाजीराव सानप, 'वाफा'चे अध्यक्ष अण्णा शेजवळ, श्री. इक्राम हुसेन, मर्क्स कंपनीचे व्यवस्थापक श्री. रवींद्रनाथन तसेच बी.ए.आर.सी. आणि कृषी पणन मंडळाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (ता. ३) हिरवा झेंडा दाखवून कंटेनर जेएनपीटी बंदरात पाठविण्यात आला.



### तीन वर्षे प्रयोग, ३८ दिवस कंटेनर शीतगृहात

निर्यातीसाठीच्या प्रयोगाची माहिती पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील यांनी दिली. ते म्हणाले, "देशातून २०१९ मध्ये अमेरिकेस सुमारे १ हजार २०० टन आंबा निर्यात झाली होती. मात्र २०२० आणि २०२१ मध्ये कोरोनामुळे होऊ शकली नाही. अमेरिकेला होणारी आंबा निर्यात ही सध्या १०० टक्के हवाईमार्गे होत आहे. यामुळे निर्यातदारांना प्रतिकिलो सुमारे ५५० रुपये विमानभाडे अदा करावे लागत आहे. यामुळे समुद्र मार्गे निर्यातीचे प्रयत्न सुरू होते. यासाठी २०१९ मध्ये भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, अपेडा, पणन मंडळ यांच्या संयुक्तरीत्या आंबा समुद्रमार्गे निर्यातीचा प्रयोग केला होता. या प्रयोगामध्ये आंब्यावर गरम पाण्याची प्रक्रिया, आंब्याच्या टिकवण कालावधी वाढविण्यासाठीची थंड पाण्यातील रासायनिक प्रक्रिया, विकिरण प्रक्रिया, प्रशीतकरण आणि शीतगृहात साठवणूक करून आंब्याचा कंटेनर भरून कंटेनर कृषी पणन मंडळाच्या विकिरण सुविधेद्वारे साठवणूक करून ठेवण्यात आला होता. हा कंटेनर ३८ दिवसांनी उघडण्यात आला. या कंटेनरमधील आंबा सुस्थितीत होता. यामध्ये काही त्रुटी आढळून आल्याने त्या दुरुस्त करून पुन्हा कंटेनर ट्रायल घेतली. यानंतर या वर्षी यशस्वीपणे आंबा निर्यात करण्यात आला.

Agrowon Dt. 06/06/2022

पुढारी

# केशर आंबा प्रथमच समुद्रमार्गे अमेरिकेला

## पणन संचालक सुनील पवार यांची माहिती; १६ हजार ५६० किलो आंब्यांची निर्यात

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**देशातून अमेरिकेला होणारी आंबा निर्यात ही सध्या शंभर टक्के हवाईमार्गे होत असली तरी, विमान भाडे अधिक आहे. मात्र यंदा केशर आंबा प्रथमच समुद्रमार्गे अमेरिकेला निर्यात करण्यात आला. त्यामुळे आंब्यांचा वाहतूक खर्च कमी होणार आहे. भारतीय आंब्याच्या निर्यातीमधील हा ऐतिहासिक क्षण असल्याची माहिती राज्याचे पणन संचालक आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, भाभा अॅटोमिक रिसर्च सेंटर, अपेडा आणि सानप ग्रोनिमल्स प्रा.लि. यांच्या संयुक्त प्रयत्नांनी आंबा निर्यात झाली आहे. पणन मंडळाच्या वाशी येथील विकीरण सुविधा केंद्रातून शुक्रवारी (दि.३) पवार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून आंबा निर्यातीसाठी तो बंदराकडे रवाना करण्यात आला.

एकूण ५ हजार ५२० बॉक्समधून १६ हजार ५६० किलो आंबा समुद्रमार्गे निर्यात करण्यात आला. त्यावेळी कार्यक्रमास भाभा अॅटोमिक रिसर्च सेंटरच्या बायोसायन्स विभागाचे संचालक डॉ. टी. के. घंटी, पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ.भास्कर पाटील उपस्थित होते.

### निर्यातीमध्ये क्रांती होणारा बदल

निर्यातदारांना प्रति किलो सुमारे ५५० रुपयांइतके विमानभाडे दयावे लागते. यामुळे अमेरिकेच्या बाजारपेठेत भारतीय आंबा किंमतीच्यादृष्टीने महाग पडून निर्यातीवर मर्यादा येत असत. समुद्रमार्गे आंबा निर्यातीमुळे अमेरिकेतील बाजारपेठेत भारतीय आंबा स्पर्धात्मकरीत्या उतरून इतर देशांतील आंब्याशी स्पर्धा करु शकेल. तसेच समुद्रमार्गे निर्यातीमुळे आंबा सुमारे दीड महिन्याच्या जादा कालावधीसाठी तेथील बाजारपेठेत राहील. भारतीय आंब्याच्या इतिहासातील ही अत्यंत महत्त्वाची घटना असुन निर्यातीमध्ये क्रांती होणारा हा बदल असल्याचेही त्यांनी सांगितले. डॉ. टी. के. घंटी यांनी कृषिमालाची निर्यात आणि कृषिमालाची साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी भाभा अॅटोमिक रिसर्च सेंटर कृषी पणन मंडळास सर्वतोपरी मदत करेल. संशोधनात आम्ही मोठे काम करीत आहोत. तथापी आमचे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषि पणन मंडळाने काम करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.




**समुद्रमार्गे अमेरिकेस आंबा निर्यात करण्यासाठी हिरवा झेंडा दाखविताना सुनील पवार, डॉ.टी. के. घंटी, डॉ. भास्कर पाटील व अन्य मान्यवर.**

My Pune Edition
Jun 7, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

नवराष्ट्र

### कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनिल पवार यांची माहिती

# भारतीय आंबा प्रथमच समुद्रमार्गे अमेरिकेला रवाना

**पुणे,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, अपेडा आणी सानप ॲग्रोॲनिमल्स प्रा. लि. यांच्या संयुक्त प्रयत्नांनी भारतीय आंबा प्रथमच समुद्रमार्गे अमेरिकेत रवाना झाला असून भारतीय आंब्याच्या निर्यातीमधील हा एतिहासीक क्षण असल्याचे प्रतिपादन राज्याचे पणन संचालक तथा महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनिल पवार यांनी केले.

शुक्रवारी कृषि पणन मंडळाच्या वाशी येथील विकीरण सुविधा केंद्र येथुन अमेरिकेला देशातून प्रथमच आंब्याची समुद्रमार्गे निर्यात करण्यात आली. यावेळी कार्यक्रमास भाभा ॲटोमिक रेसर्च सेंटरच्या बायोसायन्स विभागाचे संचालक डॉ. टी. के. घंटी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थीत होते. आंब्याच्या समुद्रमार्गे निर्यातीमुळे आंब्याचा वाहतुक खर्च १० टक्क्यावर येणार आहे. त्यामुळे अमेरीकेतील बाजारपेठेत भारतीय आंबा स्पर्धात्मकरित्या उतरुन इतर देशांतील आंब्याशी स्पर्धा करु शकेल, तसेच समुद्रमार्गे निर्यातीमुळे आंबा सुमारे दिड महिन्याच्या जादा कालावधीसाठी तेथील बाजारपेठेत राहील. भारतीय आंब्याच्या इतिहासातील ही अत्यंत महत्वाची घटना असुन आंब्याच्या निर्यातीमधील क्रांतीबदल यामुळे होईल असेही पवार यावेळी म्हणाले.



“ कृषिमालाची निर्यात आणि कृषिमालाची साठवणुक क्षमता वाढविण्यासाठी भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर कृषी पणन मंडळास सर्वतोपरी मदत करेल. संशोधनात आम्ही मोठे काम करीत आहोत तथापी आमचे संशॉधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषि पणन मंडळाने काम करावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी कृषि पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील यांनी आंबा निर्यातीसाठी केलेल्या प्रक्रिया तसेच कामकाजाबाबतची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.

**डॉ. टी. के. घंटी,** संचालक, भाभा ॲटोमिक रेसर्च सेंटरच्या बायोसायन्स.

## जलमार्गाने निर्यात खर्च कमी

भारतातून २०१९ मध्ये अमेरीकेस सुमारे बाराशे मे. टन आंबा निर्यात झाला होता. त्यानंतरची दोनही वर्षे कोरोनामुळे निर्यात झाली नव्हती. सध्या आंबा हा हवाईमार्गाने अमेरीकेला निर्यात होत आहे. यामुळे निर्यातदारांना प्रति किलो साडे पाचशे रुपये खर्च होतो. जलमार्गाने निर्यात केल्याने हा खर्च कमी होण्यास मदत होणार आहे.

तीन वर्षापुर्वी भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, अपेडा, कृषि पणन मंडळ यांनी संयुक्तरीत्या आंबा समुद्रमार्गे निर्यातीचा प्रयोग केला होता. या प्रयोगामध्ये आंब्यावर गरम पाण्याची प्रक्रिया, भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरने विकसीत केलेल्या आंब्याच्या शेल्फ-लाईफसाठीची थंड पाण्यातील रासायनीक प्रक्रिया, विकिरण प्रक्रिया, प्रशितकरण आणि शितगृहात साठवणूक करण्यात आला होता. या प्रयोगाच्या आधारे प्रक्रीया करून आंबा समुद्रामार्गे पाठविला गेला.

Pune Edition
05 June 2022 Page No. 2
epaper.navarashtra.com

लोकमत

# समुद्रमार्गे अमेरिकेस आंबा रवाना

## १६,५६० किलो निर्यात : ५ जूनला न्यू जर्सीत पहिला कंटेनर पोहचणार




समुद्रमार्गे आंब्याचा पहिला कंटेनर अमेरिकेस रवाना करताना पणन संचालक सुनील पवार व कृषी पणन मंडळ, अपेडा, बीएआरसीचे अधिकारी, कर्मचारी.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** कोरोनामुळे दोन वर्षांपासून आंब्याची बंद झालेली अमेरिकावारी यावर्षी पुन्हा सुरू झाली आहे. राज्य पणन मंडळ, बीएआरसी व अपेडाच्या प्रयत्नाने १६ हजार ५६० किलो आंब्याचा कंटेनर शुक्रवारी सायंकाळी समुद्रमार्गे अमेरिकेला रवाना झाला. ५ जूनला हा कंटेनर न्यू जर्सी शहराजवळील नेवार्क बंदरात पोहचणार आहे.

सद्यस्थितीमध्ये ७० पेक्षा जास्त देशांमध्ये आंबा निर्यात केला जात आहे. २०१९ मध्ये अमेरिकेतही १२०० मेट्रिक टन आंबा निर्यात केला होता. २०२० व २०२१ मध्ये कोरोनामुळे अमेरिकेत निर्यात करता आला नव्हता. यावर्षी पुन्हा निर्यात सुरू केली आहे. आतापर्यंत हवाईमार्गे निर्यात केली जात होती. निर्यातीला प्रतिकिलो ५५० रुपये विमान भाडे द्यावे लागत होते. यामुळे समुद्रमार्गे आंबा निर्यात सुरू केली आहे. पणन मंडळाच्या नवी मुंबईमधील विकिरण केंद्रामध्ये सर्व प्रक्रिया करून १६ हजार ५६० किलो आंब्याचा पहिला कंटेनर जेएनपीटी बंदराकडे रवाना केला.

शुक्रवारी सायंकाळी पणन मंडळाच्या विकिरण केंद्रातून पणन संचालक सुनील पवार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून पहिला कंटेनर रवाना केला. यावेळी अमेरिकेच्या निरीक्षक डॉ. कॅथरिन फिडलर, एनपीपीओचे उपसंचालक डॉ. झेड. ए. अन्सारी, अपेडाचे उपसरव्यवस्थापक रवींद्र, सानप ॲग्रोचे संचालक शिवाजीराव सानप, अण्णा शेजवळ, डॉ. भास्कर पाटील, एपीएमसीचे सचिव संदीप देशमुख उपस्थित होते.

### २०१९ मध्येही पाठविला होता आंबा

पणन मंडळाने २०१९ मध्येही समुद्रमार्गे आंबा अमेरिकेला पाठविला होता. या प्रयोगामध्ये आंब्यावर गरम पाण्याची प्रक्रिया, बीएआरसीने विकसित केलेल्या आंब्याच्या सेल्फ लाईफसाठीची थंड पाण्याची प्रक्रिया, विकिरण, प्रशीतकरण व सर्व प्रक्रिया करून आंबा कंटेनरमध्ये भरण्यात आला होता. तो कंटेनर ३८ दिवसाने उघडल्यानंतरही आंबा सुस्थितीत होता.

### अशी केली प्रक्रिया

आंबा निर्यातीसाठी २९ मे ते २ जून असे पाच दिवस आंबा नोंदणीकृत बागांमधून तोडणी करून, तो पणन मंडळाच्या नवी मुंबईतील केंद्रात आणला. आंब्याची प्रतवारी करून सोडियम हायपोक्रोराईटची ५२ डिग्री सेल्सिअस तापमानात तीन मिनिटांची प्रक्रिया केली. बीएआरसीने विकसित केलेल्या रासायनिक पाण्यात तीन मिनिटांची प्रक्रिया केली व अमेरिकेच्या निरीक्षकांनी तपासणी केली.


> पणन मंडळ, अपेडा, बीएआरसी व निर्यातदार या सर्वांच्या प्रयत्नाने आंब्याचा पहिला कंटेनर समुद्रमार्गे अमेरिकेला पाठविला आहे. हा प्रयोग यशस्वी ठरल्यास भविष्यात निर्यात मोठ्या प्रमाणात होईल.
>
> - **सुनील पवार**, पणन संचालक

पहिल्यांदाच अशाप्रकारे निर्यात; वाहतूक खर्चात प्रचंड कपात

# भारतीय आंबे समुद्रमार्गे अमेरिकेत रवाना

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** आंब्याची अमेरिकेत निर्यात आतापर्यंत विमान वाहतुकीद्वारे होत होती. या वाहतुकीच्या खर्चामुळे किंमत वाढून इतर आंबाउत्पादक देशांशी स्पर्धा करताना भारतीय आंबा काहीसा मागे पडत होता. मात्र त्यावर तोडगा म्हणून यापुढे आंबा समुद्रमार्गे तेथे पाठविला जाणार आहे. शुक्रवारी (ता. ३) भारतीय आंबे प्रथमच जलमार्गाने अमेरिकेला रवाना झाले आहेत.



## झाले काय?

भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, अपेडा आणि सानप ॲग्रो ॲनिमल्स प्रा. लि. यांच्या वतीने कृषी पणन मंडळाच्या वाशी येथील विकिरण सुविधा केंद्र येथून अमेरिकेला प्रथमच आंब्याची समुद्रमार्गे निर्यात करण्यात आली.

## निर्णयाचा फायदा...

आंब्याच्या समुद्रमार्गे निर्यातीमुळे आंब्याचा वाहतूक खर्च दहा टक्क्यांवर येणार असून त्यामुळे अमेरिकेतील बाजारपेठेत भारतीय आंबा स्पर्धात्मकरीत्या उतरून इतर देशांतील आंब्याशी स्पर्धा करू शकेल, तसेच समुद्रमार्गे निर्यातीमुळे आंबा सुमारे दीड महिन्याच्या जादा कालावधीसाठी तेथील बाजारपेठेत राहील.

भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, अपेडा आणि सानप ॲग्रो ॲनिमल्स प्रा. लि. यांच्या संयुक्त प्रयत्नांनी हे शक्य झाले. भारतीय आंब्याच्या निर्यातीमधील हा ऐतिहासिक क्षण असल्याचे प्रतिपादन राज्याचे पणन संचालक तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी केले.

भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरच्या बायोसायन्स विभागाचे संचालक डॉ. टी. के. घंटी या निमित्ताने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. टी. के. घंटी यांनी कृषिमालाची निर्यात आणि कृषिमालाची साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर कृषी पणन मंडळास सर्वतोपरी मदत करेल. संशोधनात आम्ही मोठे काम करीत आहोत तथापि आमचे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत *(पान ४ वर)*

Loksatta Dt. 05/06/2022

## भारतीय आंबे समुद्रमार्गे अमेरिकेत रवाना

*(पान १ वरून)*

पोहोचविण्यासाठी कृषी पणन मंडळाने काम करावे, असे आवाहन या वेळी केले. या वेळी कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील यांनी आंबा निर्यातीसाठी केलेल्या प्रक्रिया तसेच कामकाजाबाबतची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.

भारतातून सन २०१९ मध्ये अमेरिकेस सुमारे बाराशे टन आंबा निर्यात झाली होती. सन २०२१ आणि २०२२ मध्ये अमेरिकेत करोनामुळे निर्यात होऊ शकली नाही. सध्या अमेरिकेला होणारी आंबा निर्यात पूर्णतः हवाईमार्गे होत आहे. यामुळे निर्यातदारांना प्रतिकिलो सुमारे ५५० रुपये विमानभाडे अदा करावे लागत असून, यामुळे अमेरिकेच्या बाजारपेठेत भारतीय आंबा किमतीच्या दृष्टीने महाग पडत आहे. त्यामुळे निर्यातीवर मर्यादा येत आहेत.

सन २०१९ मध्ये भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, अपेडा, कृषी पणन मंडळ यांनी संयुक्त रीत्या आंबा समुद्रमार्गे निर्यातीचा प्रयोग केला होता. या प्रयोगामध्ये आंब्यावर गरम पाण्याची प्रक्रिया, भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरने विकसित केलेल्या आंब्याच्या शेल्फ-लाइफ साठीची थंड पाण्यातील रासायनिक प्रक्रिया, विकिरण प्रक्रिया, प्रशीतकरण आणि शीतगृहात साठवणूक करून आंब्याचा कंटेनर भरून कंटेनर कृषी पणन मंडळाच्या विकिरण सुविधेच्या आवारात विद्युत पुरवठा देऊन ठेवण्यात आला होता. हा कंटेनर ३८ दिवसांनी उघडण्यात आला. या कंटेनरमधील आंबा सुस्थितीत होता. तथापि, यामध्ये काही त्रुटी आढळून आल्याने त्या दुरुस्त करून पुन्हा चाचणी घेणे आवश्यक होते. मात्र करोना काळात ते घडू शकले नाही. यंदा ३० मे पासून आंब्यावर सर्व प्रकारच्या प्रक्रिया करून टप्प्याटप्प्याने आंबा शीतगृहात साठविण्यात आला होता. एकूण १६ हजार ५६० किलो आंबा कंटेनरद्वारे पाठविण्यात आला असून तो अमेरिकेत नेवार्क या न्यूजर्सी शहराजवळील बंदरात पोहोचेल.

लोकमत

# २३ टन काजू तारणावर २१ लाख कर्ज वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समिती व महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळातर्फे शेतीमाल तारण योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा २३.५ टन माल तारण ठेवत २१ लाख ८५ हजार रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले आहे. यावर्षीसाठी दोन कोटी रुपये कर्ज वितरणाचे उद्दिष्ट असून, ऑगस्टपर्यंत शेतीमाल तारण योजनेसाठी काजू स्वीकारला जाणार आहे.

बदलत्या हवामानाचा परिणाम काजू पिकावर होत आहे, त्यामुळे उत्पादनात घट होत आहे. यावर्षी शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी आहे. परंतु, सध्या १२४ रुपये किलोला भाव मिळत असल्याने शेतीमाल तारण योजनेसाठी अल्प प्रतिसाद लाभत आहे. मात्र, दरात घसरण झाल्यानंतर शेतकरी माल तारण ठेवत कर्ज घेऊ शकतात. शिवाय दर वाढल्यानंतर तारण मालाची विक्री करून जास्त पैसे मिळवू शकतात. शेतीमालाच्या एकूण किमतीच्या ७५ टक्केपर्यंतची रक्कम सहा महिने कालावधीसाठी सहा टक्के व्याज दराने तारण कर्ज स्वरूपात बाजार समितीतर्फे उपलब्ध करून देण्यात येत आहे.

> शेतीमाल तारण योजनेअंतर्गत शेतकऱ्यांकडील काजू १८० दिवस तारण ठेवत कमाल ७५ टक्के रक्कम तारण कर्ज देण्यात येते. कमी दराने काजू विकून शेतकऱ्यांनी स्वतःचे आर्थिक नुकसान न करता, काजू तारण ठेवत दर चांगला मिळाल्यानंतर विक्री करावी. यावर्षी २ कोटी कर्ज वितरणाचे उद्दिष्ट आहे.
>
> - **प्रमोद मोहिते**, प्रभारी सचिव, रत्नागिरी जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समिती.

जिल्ह्यात मंडणगड, दापोली, गुहागर, रत्नागिरी, राजापूर या ठिकाणी काजू बीचे जास्त उत्पादन येते. या तालुक्यांच्या तुलनेत संगमेश्वर व लांजा याठिकाणी काजू उत्पादन अल्प आहे. बहुतांश काजू बी उत्पादक शेतकरी स्वतःची गोदामे तारण ठेवण्यासाठी उपलब्ध करून बाजार समितीला देत आहेत.

गतवर्षी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून २३ शेतकऱ्यांकडील १८८.०१ मेट्रिक टन काजू बी तारण ठेवत एक कोटी ५१ लाख ६१ हजार ५३० रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले होते.